# पहिली खबर

0154179

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि, पहिली खबर क्र. FIR No. 21, वर्ष Year 2022, दिनांक Date 31-03-2022

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि-1988, कलमे Sections 7
 (ii) अधिनियम Act ...................., कलमे Sections ....................
 (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ....................

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day सोमवार, तारीख पासून Date from 28-03-2022 वेळ Time 11:30, तारीख पर्यंत Date to 30-03-2022 वेळ Time 14:34
 वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
 (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
 (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
 (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 28-03-2022, वेळ Time 11:30
 (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 06/2022 तारीख Date 31-03-2022 वेळ Time 6:40

4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P. S. 6 km दक्षिणेस चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. -
 (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name वस्तू व सेवाकर विभाग, ठिकाणाचे नंबर No. if any कक्ष-4, 840, पाचवा मजला, गल्ली Ward राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय, रस्त्याचे नाव Name of road माझगाव
 जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place महाराणा प्रताप चौक, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
 (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणासचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
 (a) नाव Name श्री गजानन रमाकांत देसाई (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री रमाकांत देसाई
 (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 58 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9820049248
 (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
 (g) धर्म Religion हिंदू जात Caste ओ.बी.सी उपजात Sub-Caste ........
 (h) पत्ता Address : प्लॉट नं. 60 डी, गल्ली / सर्व्हे नं. Ward आशी 60 कं, घर / नाव नं. House/Name No. कुलाबा प्रसाद, फोन / मो. नं. Phone/Mo. No. तिसरा मजला, पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
 रस्त्याचे नाव Road श्रद्धानंद आचार्य मार्ग, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place दादर (पू), गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
 तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
 Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
 नितीन अर्जुनराव बागल, वय 48 वर्षे, व्यवसाय - नोकरी (सहाय्यक राज्यकर आयुक्त), D-840, नोडल-IV, राहि. 102, सुवर्णा आनंद प्लॉट नं. 4 सेक्टर 8(अ) सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

Y.P.P.—800 Reg.-(25×6=150 Lvs.)—2-2018—PA3—(R) 829

'फिर्यादी श्री. गजानन रमाकांत देसाई, वय-58 वर्षे, व्यवसाय व्यापार, रा.ठि. प्लॉट नं. 60 अ आणि 60 ब, कुलाबा प्रासाद, तिसरा मजला, यशवंत जाधव मार्ग, दादर (पू), मुंबई यांची सविस्तर फिर्याद स्वतंत्र कागदावर संगणीकृत करण्यात आली असून, तिच गुन्ह्याची पहिली खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

31/03/2022

31/03/2022

(सुप्रिया नटे)
पोलीस निरीक्षक,
आ.प्र.वि. मुंबई.

फिर्याद दिनांक – ३०/०३/२०२

श्री. गजानन रमाकांत देसाई, वय ५८, धंदा – व्यवसाय (काजु प्रक्रिया करणे), रा.ठि.– प्लॉट नं ६० डी आणि ६० एफ, दुलाबा प्रासाद, तिसरा मजला, सदानंद जाधव मार्ग, दादर(पू), मुंबई–४०००१४ मो.क्र. ९८२००४९२४८, ९८६७७३९९१०

.....

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझ्या कुटुंबियांसमवेत राहावयास आहे. मी कॅन्ट्रॉनिक्स (इंडिया) या कंपनीचा मालक असून नमूद कंपनी अंतर्गत काजु प्रक्रिया करून त्याची विक्री करण्याचा माझा लहान व्यवसाय आहे त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी कॅन्ट्रॉनिक्स (इंडिया) या कंपनीचा मालक असून सदरचा व्यवसाय हा एमएसएमई ॲक्ट आणि जीएसटी ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत आहे. नमूद कंपनीचे कार्यालय दादर पूर्व, मुंबई येथे आहे. लोकसेवक श्री नितीन अर्जुनराव बागल, असिस्टंट कमिशनर ऑफ स्टेट टॅक्स यांनी आमच्या वर नमूद कंपनीचे बरोडा डेअरीचे विक्री संदर्भातील सन २०१६–१७ या वर्षाचे सी फॉर्म लोकसेवक यांच्या कार्यालयामध्ये जमा न केल्यामुळे त्यांनी सदर बाबत आदेश क्र. ०००४०९३९०६, दि. २८/०७/२०२१ अन्वये आमचे कंपनीकडून रू. १,६८,८३८/– इतका भरणा करणे बाकी असल्याचा अंतिम मुल्यांकन आदेश काढला. नमूद आदेशाच्या अनुषंगाने मी संबंधित कंपनीकडून सी फॉर्म उशिराने प्राप्त झाल्यामुळे त्याबाबत जानेवारी–२०२२ मध्ये मी ऑनलाईन रेक्टीफिकेशन ॲप्लीकेशन लोकसेवक यांच्या कार्यालयाला केलेले आहे.

फेब्रुवारी २०२२ मध्ये माझ्या सांगणेवरून आमचे कंपनीचे सीए श्री आदित्य प्रधान यांनी संबंधीत कागदपत्रासहित लोकसेवक श्री नितीन बागल यांच्या कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेतली व त्यांना आवश्यक ते कागदपत्र जमा करून घेणेबाबत विनंती केली. त्यावेळी लोकसेवक यांनी सदरची सर्व कागदपत्रे स्विकारण्यास नकार देवून रू. ३०,०००/– इतक्या लाचेची मागणी केली. सदर बाब सीए श्री आदित्य प्रधान यांनी मला सांगितले. त्याचप्रमाणे दि. २४/०३/२०२२ रोजी लोकसेवक यांच्या कार्यालयातून आमचे कंपनीला संबंधित आवश्यक कागदपत्रे दि. २८/०३/२०२२ रोजीपूर्वी जमा करणेबाबत ईमेल प्राप्त झाला. त्यानुसार मी दि. २५/०३/२०२२ रोजी लोकसेवक यांना त्यांच्या कार्यालयात भेटण्याकरिता गेलो असता, आमच्या कंपनीच्या वतीने केलेल्या रेक्टीफिकेशन अर्जाला मान्यता देण्याकरिता लोकसेवक यांनी पुन्हा रू. ३०,०००/– इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केली. तसेच यापुढे कार्यालयामध्ये येताना कागदपत्रासोबत लाचेची रक्कम देखील घेवून येण्यास सांगितले.

मला श्री नितीन बागल यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे दिनांक २८/०३/२०२२ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमक्ष हजर राहिलो. त्यावेळी वरिष्ठांनी सांगितल्याप्रमाणे लोकसेवक श्री नितीन अर्जुनराव बागल, असिस्टंट कमिशनर ऑफ स्टेट टॅक्स यांचे विरूध्द मी संगणकावर इंग्रजीमध्ये तयार केलेला प्रिटेंड तक्रार अर्ज पोनि सुप्रिया नटे यांचेकडे दिला. पो. नि. सुप्रिया नटे यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले.

पंच हजर झाल्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला सदर ठिकाणी हजर असलेले सपोआ नितीन दळवी, दोन सरकारी पंच व पोलीस पथक यांची ओळख करून दिली.

त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी त्याच्या ताब्यातील मी दिलेला तक्रार अर्ज पचांना वाचावयास दिला. सदर तक्रार अर्जातील मजकूर वाचून त्याबाबत पंचानी माझयाकडे विचारून खात्री केली.

दिनांक ३०/०३/२०२२ रोजीचा जबाब पुढे चालू.....

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांच्या सुचनेवरून दोनही पंचांनी मी दिलेल्या तक्रार अर्ज व सोबत दिलेल्या कागदपत्रावर सह्या केल्या. पो.नि. सुप्रिया नटे यांनी समक्ष म्हणुन सही करून सदर तक्रार अर्ज स्वत:च्या ताब्यात घेतला.

नमूद पंचनाम्या दरम्यान मला लोकसेवक यांनी त्यांच्या भेटी दरम्यान "संबंधित कागदपत्रांसोबत पैसे घेवून येणार असाल, तरच या अन्यथा येवू नका" असे यापूर्वीच्या भेटीत सांगितले असल्यामुळे त्याबाबत मी पोनि सुप्रिया नटे यांना पंचासमक्ष सांगितले त्यामुळे मी केलेल्या विनंती वरून मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लोकसेवक यांना त्यांच्या मोबाईल क्र. ९८९२८९६६३९ वर संपर्क करून लोकसेवक यांनी केलेल्या लाचेच्या मागणीसंदर्भात पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला सापळा कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो. नि. सुप्रिया नटे हया मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहिल्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेल्या तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो. नि. सुप्रिया नटे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांचे सुचनेनुसार माझे वर नमूद मोबाईल क्रमांक ९८२००४९२४८ वरून लोकसेवक नितीन बागल यांचा मोबाईल क्र. ९८९२८९६६३९ या क्रमांकावर फोन केला व फोन स्पिकर ऑन केला. नमुद वेळी लोकसेवक यांनी फोन स्विकारला नाही त्यामुळे पुन्हा काही वेळानंतर मी नमुद मोबाईल क्रमांकावर फोन केला. त्यावेळी लोकसेवक यांनी फोन स्वीकारला परंतु ते माझ्याशी न बोलता इतर व्यक्तींशी बोलत होते. त्यामुळे त्यावेळी ही लोकसेवक यांच्याशी बोलणे होऊ शकले नाही. त्यांनतर काही वेळाने पुन्हा मी लोकसेवक यांच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता त्यांनी माझा फोन स्विकारला. नमुद संभाषणा दरम्यान मी माझ्याकडील कागदपत्रे रेडी असल्याचे लोकसेवक बागल यांना सांगितले असता त्यांनी दुसऱ्या दिवशी कागदपत्रे घेवून भेटावयास येणेबाबत सांगितले. त्यावेळी मी  लोकसेवक यांनी मागणी केलेल्या रकमेबाबत विचारणा केली असता, लोकसेवक यांनी त्यांचा फोन कट केला. सदरचे संभाषण व्हॉईस रेकॉडरद्वारे ध्वनीमुद्रीत करण्यात आले. सदरबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा तयार करून सदर दिवशीची पडताळणी कारवाई पूर्ण करण्यात आली.

त्यानंतर दिनांक २९/०३/२०२२ रोजी  पो.नि. सुप्रिया नटे यांनी दिनांक २८/०३/२०२२ रोजी दिलेल्या सुचनेनुसार मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे येण्याकरीता निघालो असताना लोकसेवक यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक ९८९२८९६६३९ वरून माझे मोबाईलवर फोन केला. त्यावेळी मी सदरचा फोन घेतला नाही व ला.प्र.वि. कार्यालयात आल्यानंतर सदरबाबत मी पो.नि. सुप्रिया नटे यांना पंचा समक्ष सागितले. त्यामुळे नमुद कॉलला प्रतिसाद म्हणून प्रथम लोकसेवक यांना मोबाईल क्रमांकावर ९८९२८९६६३९ फोन करण्यात येऊन त्याद्वारे पडताळणी करण्यात येईल. असे पो.नि. सुप्रिया नटे यांनी सांगितले. त्यानुसार पो.नि. सुप्रिया नटे, माझे, पचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत झाल्यानंतर

समक्ष,

31/03/2022

(सुप्रिया नटे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

31/03/2022

मी लोकसेवक श्री. बागल यांच्या वर नमुद मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता त्यांनी फोन रिसीव्ह केला. नमुद झालेल्या संभाषणा दरम्यान लोकसेवक यांनी ते त्यांच्या कार्यालयात नसल्याचे सांगून मला उदया दि. ३०/०३/२०२२ रोजी सकाळी साडे अकरा बारा पर्यत त्यांच्या कार्यालयामध्ये भेटावयास येणेबाबत सांगितले. त्यानंतर लोकसेवक यांनी त्यांचा फोन कट केला. सदरचे संभाषण व्हाईस रेकॉडरद्वारे ध्वनीमुद्रीत करण्यात आले. सदरबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा तयार करून सदर दिवशीची पडताळणी कारवाई पूर्ण करण्यात आली.

त्यानंतर दिनांक ३०/०३/२०२२ रोजी पो.नि. सुप्रिया नटे यांनी दिनांक २९/०३/२०२२ रोजी दिलेल्या सुचनेनुसार मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे सकाळी १०.३० वा. सुमारास हजर झालो. नमुद वेळी पंच, सपोआ दळवी हे पो.नि. सुप्रिया नटे यांच्या कक्षामध्ये हजर होते. नमुद वेळी पो.नि. सुप्रिया नटे यांनी आज रोजी लोकसेवकाच्या कार्यालयात जाऊन पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानुसार पो.नि. सुप्रिया नटे, माझे, पचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत झाल्यानंतर मी, पो.नि. सुप्रिया नटे, स.पो.आ. दळवी दोन पंच व पडताळणी/सापळा कारवाई पथक असे पडताळणी/सापळा कारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह मी वापरत असलेली मो. वाहन क्र. एम.एच. ०१ सीटी ९२५५ व दोन शासकीय वाहनामधून लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयाकडे रवाना झालो. कार्यालयापासुन काही अंतरावर सेंट पिटर हायस्कुल, शिवदास चापसी मार्ग, माझगाव, मुंबई येथे रस्त्यालगत कोणालाही संशय येणार नाही अशाप्रकारे वाहने थांबविली. त्यावेळी पो.नि. सुप्रिया नटे, यांनी मला व पंच श्री. पंकज सोनावले यांना पडताळणी बाबत योग्य त्या सुचना देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टाच्या आतील बनियानला लावला. त्यांनंतर मी, व पंच श्री. पंकज सोनावले असे लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो. सदर ठिकाणी गेल्यानंतर लोकसेवक श्री. बागल साहेब यांच्याशी माझी समक्ष भेट झाली. त्यावेळी झालेल्या चर्चे दरम्यान लोकसेवक श्री बागल यांच्याशी सन २०१६–१७ चे सी फॉर्म संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक यांनी पंच श्री. सोनावले यांच्या बाबत विचारणा केली असता मी त्यांना संशय येऊ नये म्हणून ते सी.ए. श्री. प्रधान यांचे क्लर्क असले बाबत सांगितले. त्यावेळी त्यांनी माझेकडे रेक्टीफिकेशन अर्जा संदर्भात सादर करावयाचे कागदपत्राबाबत विचारणा केली. त्यावेळी सदर कागदपत्रे मी बागल साहेबाना दिली. त्यानंतर त्यांनी त्यांचे क्लर्क श्री. नामदेव जाधव यांना व माझे सोबत असलेल्या पंच श्री. पंकज सोनावले यांना कागदपत्राची तपासणी करण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक यांनी हाताने खुण करून त्यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी त्यांना " आपल शुक्रवारी डिस्कस झाल्याप्रमाणे ना? ..... तुम्ही थर्टी सांगितल मी थर्टीच पाकिट तयार केलय " असे म्हणून त्यांनी मागणी केलेल्या ३० हजाराबाबत विचारणा केली व सदरची रक्कम कमी करण्याची विनंती केली. त्यावेळी लोकसेवक यांनी मला " तुमचा मान ठेवतो " असे म्हणून कॅलक्युलेटरवर २५ हा आकडा टाईप करून मला दाखविला. त्यावेळी मी त्यांना " २५ करू

समक्ष,

(सुप्रिया नटे) 31/03/2022

पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

31/03/2022

दिनांक ३०/०३/२०२२ रोजीचा जबाब पुढे चालू.....

ठिक आहे '' अशी विचारणा केली असता त्यांनी मला आणलात का? असे विचारले त्यावेळी मी सदरची रक्कम माझ्या गाडीमध्ये राहीली असा बहाणा करून सदरची रक्कम आणण्याकरीता जातो असे सागितले. त्यावेळी लोकसेवक यांनी त्यांच्या कार्यालयातील क्लर्क श्री नामदेव जाधव यांना घेऊन जा हा येईल त्यांच्याकडेच करा असे म्हणून लाचेची रक्कम त्यांच्या हातात देण्यास सांगितले. त्यानंतर मी दिलेल्या कागदपत्राची तपासणी झाल्यानंतर त्यापैकी एक सेट श्री. नामदेव जाधव यांनी स्विकारून दुसऱ्या सेटवरील पहिल्या पानावर पोचपावती दिली. त्यानंतर मी, श्री नामदेव जाधव, पंच श्री. सोनावले असे खाली निघालो. मला नैसगिक विधीकरीता जावयाचे असल्याने मी, श्री. नामदेव जाधव, पंच श्री. सोनावले असे आम्ही चौथ्या माळयावरील शैचालयमध्ये गेलो. मी फ्रेश झाल्यानंतर मी बाहेर येऊन पाहिले असता क्लर्क जाधव तेथून निघून गेले होते. त्यामुळे मी व पंच सोनावले शासकीय वाहनाकडे निघून आलो.

सदर ठिकाणी आल्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे व सपोआ दळवी यांना झालेली सर्व हकिकत सांगून लोकसेवकाने रु २५,०००/— इतकी लाचेची मागणी केली असले बाबत मी त्यांना माहिती दिली. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे, सपोआ दळवी यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन त्याबाबत खात्री केली व त्यानंतर लागलीच सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे पो.नि. सुप्रिया नटे यांनी मी, पंच व सापळा पथक यांना दिली.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाई बाबतची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला लोकसेवक बागल यांना दयावयाचे रु. २५,०००/— ( अक्षरी रु. पंचवीस हजार ) लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझे कडील बचतीतील भारतीय चलनाच्या रु. ५००/— दराच्या ५० नोटा, एकुण रु. २५,०००/— (अक्षरी रु. पंचवीस हजार) त्यांचेकडे दिले. सदर रक्कमेचे मोबाईलच्या साहयाने छायांकित घेऊन त्यांचे नंबर सापळा पथकातील अंमलदाराच्या मदतीने नोंद करण्यात आले. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांचे सुचनेनुसार तेथे हजर असलेले सपोउनि चा. क्र. २८१७९ श्री. जामसांडेकर यांनी पंचासमक्ष अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. त्यानंतर त्यांनीच लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली. व सदरची रक्कम एका सफेद रगांच्या पाकीटामध्ये भरून सदर पाकिटाला देखील बाहेरील बाजूने अँथ्रासीन पावडर लावून सदरचे पाकीट माझ्याकडे असलेल्या चॉकलेटी रंगाच्या लेदर बॅगेमध्ये ठेवले व ते सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले.

पो.नि सुप्रिया नटे यांनी लोकसेवक बागल यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर उजव्या हाताने थंम्बचा इशारा करून पुर्वनियोजीत इशारा करावा असे मला सांगितले. त्यावेळी सापळा पथक हे कोणास संशय येणार नाही असे आजुबाजुस थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

समक्ष,

31/03/2022

31/03/2022

(सुप्रिया नटे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे, यांनी मला योग्य त्या सुचना देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टाच्या आतील बनियानला लावला. त्यानंतर मी, व पंच श्री. पंकज सोनावले असे लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो. व सापळा कारवाईतील पथक लोकसेवक यांचे कार्यालयामध्ये लोकसेवकाच्या केबीनजवळ कोणसही संशय येणार नाही अशा रीतीने थांबुन राहीले. मी लोकसेवक बागल यांची त्यांचे कक्षात भेट घेतली त्यावेळी त्यांचे क्लर्क श्री नामदेव जाधव परस्पर निघून गेल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक बागल यांनी इशाऱ्याने माझ्या सोबत असलेल्या पंच श्री पकंज यांना खाली जाण्यास सांगणेबाबत मला सांगितले असता मी पंच श्री. पंकज यांना खाली गाडीजवळ थाबण्यास सांगितले. त्यावेळी ते केबीन बाहेर गेले. त्यानंतर मी त्यांना माझे कामा संदर्भातील ऑर्डर केव्हा निघेल त्याबाबत विचारणा केली असता लोकसेवक बागल यांनी उदया किवा परवा ऑर्डर निघेल असे सांगितले. त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील राखाडी रंगाची कागदपत्राची फाईल ओपन करून हाताच्या इशाऱ्याने लाचेची रक्कम ठेवण्यास सांगितले असता मी, " थक्यू साहेब पाच हजार रूपये डिस्काऊट दिल्याबद्दल थँक्यू, हे पंचवीस हजार आहेत. " असे सांगितले व लाचेची रक्कम असलेले पाकिट त्यांच्याकडे दिले असता लोकसेवक यांनी " चालेल चालेल " असे म्हणून सदरचे लाचेची रक्कम असलेले पाकिट स्विकारून त्याचे जवळील राखाडी रंगाच्या फाईलमध्ये ठेवले. त्यानंतर मी सदर ठिकाणाहून बाहेर पडलो. त्यावेळी ते ही लाचेची रक्कम ठेवलेली फाईल हातात घेऊन माझे मागोमाग केबीनच्या बाहेर पडले. त्यानंतर सदर ठिकाणाहून बाहेर पडून लॉबीमध्ये आलो असता तेथे पंच श्री. पंकज सोनावले हे देखील सदर ठिकाणी थांबले होते. सापळा पथकास दिसेल अशा पध्दतीने उजव्या हाताने थम्बचा पूर्वनियोजित इशारा केला असता सापळा पथकातील पोलीसांनी तात्काळ लोकसेवक बागल यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले.

लोकसेवक श्री. नितीन अर्जुनराव बागल, सहाय्यक राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव, मुंबई – १० यांनी माझ्या मालकीच्या कॅन्ट्रानिक्स इंडिया या कपंनीच्या विक्री संदर्भातील सन २०१६–१७ चे बरोडा डेअरी या कपंनीचे सी फॉर्म जमा न केल्यामुळे माझे कपंनीकडून रु १,६८,८३८/– इतका भरणा करण्याबाबत अंतिम मुल्याकन आदेश काढला. नमुद आदेशाच्या अनुषंगाने सन जानेवारी २०२२ मध्ये केलेल्या रेक्टीफिकेशन ॲपिलेकशनच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे व सी फॉर्म जमा करण्यास मी गेलो असता माझेकडे त्याबाबत रु ३०,०००/– ( रु तीस हजार ) इतक्या लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु २५,०००/– (रू पंचवीस हजार ) इतकी लाचेची रक्कम माझे कडुन स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे, लोकसेवक श्री. नितीन अर्जूनराव बागल यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहीली असता माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

31/03/2022

(सुप्रिया नटे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

31/03/2022
(Gajanan R. Desai)

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..................

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

रु. 25000/- (भारतीय चलनाच्या रु. 500/- रु. दराच्या 50 नोटा

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..... रु. 25000/-

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

वरील बाजूस नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आलोसे नितीन अर्जुनराव वाघल यांनी "फि." यांच्या मालकीच्या कन्झ्युमिक्स (इंडिया) या कंपनीचा सन 2016-17 चे वार्षिक रिटर्न्स आणि या कंपनीचे विक्री अहवालातील सी फॉर्म जमा न केल्यामुळे फि. यांचे कंपनीकडून रू. 1,68,838/- इतकी भरणा करण्याबाबत अंतीम मूल्यांकन आदेश काढला. नमूद आदेशाला अनुसरुन फिर्यादी यांनी ऑनलाईन रेक्टीफिकेशन ॲप्लीकेशन जानेवारी 2022 मध्ये केल्यानंतर आवश्यक कागदपत्र व सी फॉर्म जमा करण्याकरिता फि. आलोसे यांच्या कार्यालयात गेले असता आलोसे यांनी फि. "..." यांचेकडे रू. 50,000/- इतक्या लाचेची मागणी करून तडजोडअंती रू. 25,000/- इतकी लाचेची रक्कम स्वीकारली म्हणून गु.र.क्र. 21/22 भ्र.प्र.अ. 1988 कलम 7 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

सुप्रिया नटे, पोलीस निरीक्षक.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank .......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .................. (3) Transferred to P. S. ..................

District .................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

31/03/2022 [signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

[signature] 31/03/2022

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ..... सुप्रिया नटे

पदनाम Rank ..... पोलीस निरीक्षक.

तपासिक अं. चा कोड क्र. ..... ला.प्र.वि. मुंबई.

Posting

Code No. of I.O. ..................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..................

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report